# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १/२०२३

तक्रारकर्ता, श्री.स्वप्नील अनिल जोशी
घर नं.४८, गुरुकृपा निवास, वेताळपाडा
ता.भिवंडी, जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख
अभिलेख विभाग, भिवंडी निपामपूर शहर
महानगरपालिका, भिवंडी, मुख्य प्रशासकीय इमारत
काप आळी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०२

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख
अभिलेख विभाग, भिवंडी निपामपूर शहर
महानगरपालिका, भिवंडी, मुख्य प्रशासकीय इमारत
काप आळी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०२

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १८/६/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १७/१०/२०२२ | २३/१२/२०२२ | २२/११/२०२२ | १५/१२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२/१/२०२३ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १८/६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती अपर्णा भोईर अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती दिप्ती बयास, अभिलेख विभाग प्रमुख, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" मौजे वाणी आळी ता.भिवंडी येथील जमीन सि.सं.नं.१५०४, १५०५, १५०६ व १५०७ या जमिनीवर मनपाकडून इमारत बनवण्याकरीता बांधकाम परवानगी नं.२४ दिनांक २९.०५.१९८१ नुसार बांधकाम परवानगी जारी केली आहे मला या बांधकाम परवानगीची नक्कल, मंजुर प्लॅनची नक्कल सहीशिक्क्यासह देण्यात यावी"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१५/१२/२०२२ रोजी, "*जन माहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, अभिलेख विभाग यांनी अपिलकर्ता यांना ०७ दिवसांत अपेक्षिलेली माहिती उपलब्ध करून देण्याबाबत नगररचना विभागास पत्र देण्यात यावे.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसते की, तक्रारदार यांनी शहर विकास विभाग भिवंडी महानगरपालिका यांचेकडे माहिती मागणीसाठी अर्ज केला होता. सदर विभागाने हा माहिती अर्ज अभिलेख विभागाकडे हस्तांतरित केला.

अभिलेख विभागातर्फे तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त भिवंडी महानगरपालिका यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त(मु.), भिवंडी निजामपूर शहर मनपा यांनी दि.१५/१२/२०२२ रोजी आदेश पारीत करून निर्देश दिले की, जन माहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, अभिलेख विभाग यांनी अपिलकर्ता यांना ०७ दिवसांत अपेक्षिलेली माहिती उपलब्ध करून देण्याबाबत नगररचना विभागास पत्र देण्यात यावे. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा प्र.कार्यालयीन अधिक्षक, नगररचना विभाग, भिवंडी निजामपूर मनपा यांनी तक्रारकर्ता यांना दि.२३/१२/२०२२ च्या पत्रान्वये असे कळविले की, मौजे-भिवंडी, सि.सं.नं..१५०४, १५०५, १५०६ व १५०७ या जमिनीवर देण्यात आलेली बांधकाम परवानगी नं.२४, दि.२९/५/१९८१ या परवानगीची नक्कल, मंजूर प्लॅन अपेक्षिलेला आहे. नगररचना विभागाचे कामकाज हे ऑगस्ट १९८६ पासून सुरू झाले असून, प्रचलित कार्यप्रणाली नुसार बांधकाम परवानगी बाबतचा सन १९९५ नंतरचा तपशिल हा नगररचना विभागाकडे उपलब्ध आहे. आपण मागितलेली माहिती ही सन १९८१ मधील असून, सदर कालावधीत सद्या अस्तित्वात असलेला नगररचना विभाग कार्यरत नव्हता. त्यामुळे आपण अपेक्षिलेली माहिती उपलब्ध करून देण्यास हे कार्यालय असमर्थ आहे.

यावरून दिसते की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती नेमकी कोणत्या विभागाकडे उपलब्ध आहे याबाबत संबंधित विभागांत संभ्रम दिसून येतो. त्यामुळे स्वत: महानगरपालिका आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी या प्रकरणी चौकशी करून सदरची माहिती त्यांचे महानगरपालिकेच्या कोणत्या विभागाकडे उपलब्ध आहे हे ठरवून त्या विभागास सदर माहिती तक्रारदारास उपलब्ध करून देण्याचे आदेश देणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कोणत्या विभागाकडे आहे, याबाबत **महानगरपालिका आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका** यांनी पुढील १५ दिवसांत निर्णय घेऊन, त्या विभागास ही माहिती तक्रारकर्ता यांना उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावे. महानगरपालिका आयुक्तांकडून असे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी त्यापुढील १५ दिवसांत तक्रारकर्तास माहिती नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क उपलब्ध करून द्यावी. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती जर उपलब्ध नसेल तर उपलब्ध नसल्याची विविक्षित कारणे देखील तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत कळवावी.

२. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महानगरपालिका आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी पुढील सुनावणीस आयोगास सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.४/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ जून, २०२५ .

**आदेशाच्या अनुपालनार्थ प्रत रवाना,**
महानगरपालिका आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी,
मुख्य प्रशासकीय इमारत, काप आळी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०२